INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# भारतीय इतिहास लेखन प्रवाहातील मार्क्सवादी इतिहास लेखन एक मिमांसा

**प्रा.डॉ. बी. डी. जाधवर**

इतिहास विभाग प्रमुख
बलभीम महाविद्यालय, बीड
**E-mail:** bapujadhavar16@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-25639716/IRJHIS2107036

**प्रस्तावना :**

जागतिक पातळीवरील इतिहास लेखनाची मिमांसा समजून घेत असताना असे स्पष्ट होते की, जगाच्या पाठीवर जे देश अस्तीत्वात आहेत. त्या प्रत्येक देशाला इतिहास आहे. मग इतिहास असेल तर तो इतिहास तयार होत असतांना किंवा त्याचे लिखान किंवा लेखन करताना त्यामध्ये वेगवेगळे प्रवास उदयास येतात. इतिहासात प्रवाह उदयास आल्याशिवाय त्या इतिहासाचे लेखन पूर्ण होत नाही, हे इतिहास अभ्यासकांना मान्य करावे लागते. मग इतिहास हा अमेरिकेचा असेल रशिया, चिन, जपान, भारत म्हणजे जगातील सर्व देश या मध्ये येतात. रशियाचा इतिहास पहाता तेथे साम्यवादी प्रवाहाची जाणीव होते. तर चिनच्या इतिहासाकडे पहाता साम्यवाद आणि कम्यूनिझम हे प्रवाह दिसतात असे प्रवाह अमेरिका व जगातील इतर छोट्या मोठ्या देशात निर्माण झाल्याचे आपणास इतिहासाची मिमांसा करत असताना लक्षात येते.

वरील उल्लेखलेल्या सर्व देशातील वेगवेगळे प्रवाह या शोध निबंधात आपण पाहणार नाहीत. परंतू भारतीय इतिहास लेखनातील विविध इतिहास लेखन प्रवाहाचा मात्र आढावा घेतला जाणार आहे. भारतीय इतिहास लेखनात भारतीय इतिहासकारांनी प्रामुख्याने इतिहास लेखनाचे चार प्रवाह मांडलेले आहेत. त्या प्रवाहापैकी वसाहतवादी प्रवाह, राष्ट्रवादी प्रवाह, मार्क्सवादी प्रवाह आणि सबार्ल्टन इतिहास लेखन प्रवाह असे चार प्रवाह विशद केलेले आहेत. याशिवाय प्राच्यविद्याप्रवाह या प्रवाहातील विल्यम जोन्स, जेम्स प्रिन्सेप, मॅक्समुल्लर, सर जॉन मार्शल, डॉ. रखवालदास बॅनर्जी व दयाराम सहानी, बर्जेस भांडारकर या इतिहासकारांनी प्राच्यविद्या इतिहास लेखन प्रवास समृध्द केल्याचे स्पष्ट होते. वरील प्रवाहानंतर साम्राज्यवादी प्रवाह पाहता आर.सी. मुजूमदार, किंकेड सी.ए., व्हि.ए. स्मिथ, जेम्स मिल, जॉन माल्कन या इतिहास लेखकांच्या लिखानामुळे वसहातवादी इतिहासात लेखन प्रवाहाची माहिती जगासमोर आली. साम्राज्यवादी इतिहास लेखन प्रवाहानंतर राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह समजून घेताना असे स्पष्ट होते की, आचार्य

जावडेकर, महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, आर.सी. मुजूमदार, दादाभाई नौरोजी, वि.का. राजवाडे, वासदेुवशास्त्री खरे इत्यादी इतिहास लेखकांनी संशोधकांनी व लेखकांनी राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह लिखानाच्या माध्यमातून लोकप्रिय बनवला हे सत्य नाकारता येणार नाही. राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाहानंतर मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहात डी.डी. कोसंबी, रोमिला थापर, इरफान हबीब, आर.एस. शर्मा, सुमीत सरकार, एम.एन. रॉय., कॉ. शरद पाटील वगैरे लेखकांच्या लिखनाने मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह जगासमोर आला. तर सबार्ल्टन इतिहास लेखन प्रवाहात रणजीत गुहा, डॉ. सुमित सरकार, उमा चक्रवर्ती, पार्थ चटर्जी, महात्मा फुले या सबाल्टर्न लेखकांनी वंचीतांच्या इतिहासात किंवा प्रवाहावर प्रकाश टाकला आहे. वरील पाच प्रवाह नमूद केल्यानंतर या शोध प्रबंधात केवळ मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाचीच मिमांसा करण्यात येणार आहे, ती खालील प्रमाणे.

वरील प्रमाणे पाच इतिहास लेखन प्रवाहाची ओझरती चिकित्सा केल्यानंतर मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाचा संक्षीप्त आढावा घेत असताना असे नमूद केले आहे की, मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाचा प्रारंभ इ.स. १८४८ पासून सुरु झाला. कार्ल मार्क्स यांच्या प्रेरणेने हा प्रवाह इतिहासात निर्माण झाला. तोच पुढे मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह या नावाने ओळखला जातो. आर्थिक घडामोडीचा इतिहास हा नवीन प्रवाह कालांतराने इतिहासात पुढे आला. त्यामुळे कामगार, शेतकरी, शोषित, पिडीत इत्यादी घटकांच्या इतिहासाचे लिखान करण्याचे काम इतिहासकार करू लागले. तेंव्हा राजसत्तेच्या इतिहासाचे रेखाटन करण्याचे काममात्र जगातील बहुतांश देशातील इतिहासकारांनी थांबल्याचे स्पष्ट होते.

इ.सनाच्या १९ व्या शतकापासून इतिहासाकडे पहाण्याचे जे विविध पैलू निर्माण झाले. त्या पैलूपैकी इतिहासाचा आर्थिक बाजूने अर्थ लावण्याचा जो प्रयत्न करण्यात आला. त्यास मार्क्सवादी इतिहास असे नाव देण्यात आले. इतिहासातील मानवी घडामोडीस आर्थिक बाजु असतात. त्यामुळे माणसांच्या कृती त्यांच्या आर्थिक गरजातून व हितसंबंधातून निर्माण होतात, असा विचार १९ व्या शतकात एकाएकी नवीन विशद केला असे म्हणतात येणार नाही. मार्क्सपूर्व अनेक विचारवंतानी यासंदर्भात विचार नमूद केले होते. परंतू इतिहासाचे आर्थिक भैतिकदृष्ट्या विश्लेषण हे खऱ्या अर्थाने मार्क्सनेच केले होते हे सत्य आहे. मार्क्सच्या वरील विचारास दुजोरा देणारी अनेक मंडळी समोर आली व त्यांनी मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह समृध्द केला. त्याविषयीचे विवेचन खालील प्रमाणे करत आहे.

**डॉ. आर.एस. शर्मा :-**

मार्क्सवादी इतिहासलेखन प्रवाह पुढे विस्तारण्याचे महत्वाचे कार्य मार्क्सनंतर आर.एस. शर्मा यांनी केले. यांचा जन्म बिहारमधील बरोनी या गावी इ.स. १९२० मध्ये झाला होता. कालांतराने उच्च शिक्षण संपादन केल्यानंतर पाटणा व भागालपूर येथील महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाचे काम केले. कालांतराने म्हणजे १९५८-७३ या काळात पाटणा विद्यापीठात इतिहासाचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून काम केले. पुढे १९७३ ते १९७८ या काळात दिल्ली विद्यापीठात ते विभागप्रमुख होते. ते इंडियन हिस्ट्री कॉंग्रेसचे ते सभापती होते. इ.स. १९५७ मध्ये स्थापन झालेल्या भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे ते पहिले अध्यक्ष होते. त्यांचे विविध भाषेतील ग्रंथ विविध भाषेत भाषांतरीत झाले.

यावरून संशोधनाच्या क्षेत्रातील त्यांचे मोठे पण समोर येते ते मार्क्सवादी इतिहास लेखनाचे प्रणेते आहेत, असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही.

**इरफान हबीब :-**

मार्क्सवादी विचार प्रवाहाला प्रगतीपथावर पोहचवणारे इरफान हबीब हे एक प्रख्यात लेखक होय. त्यांनी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले. तसेच I.C.H.R. चे अध्यक्षपद भूषवले. मार्क्सवादी इतिहास लेखकांच्या मतानुसार असे स्पष्ट होते की, मध्यकालीन भारताचा इतिहास समजून घ्यावयाचा असेल तर मराठा-मोघल संघर्ष समजून चालणार नाही. तर तो समजण्यासाठी शेतकरी, कारागीर, कष्टकऱ्यांच्या परिस्थितीमधून आणि आर्थिक घडामोडींच्या वृत्तांतातून समजून घेतला पाहिजे, हिच भूमीका दिल्ली व अलीगढ विद्यापीठात इतिहास विषयाचे प्रोफेसर म्हणून काम करणाऱ्या इरफान हबीब यांनी मांडली. त्यांचे इतिहास लेखन हे प्रामुख्याने मध्ययुगीन आणि मोगल इतिहाससंबंधी आहे. त्यामुळे त्यांनी मोगलांच्या राजकीय इतिहासाला महत्व न देता आर्थिक इतिहासाचाच मागोवा घेतला होता, हे प्रामुख्याने नमूद करावे लागते.

इरफान हबीब यांनी The Agararian System of the Mughal हा ग्रंथ लिहीला या ग्रंथामध्ये त्यांनी शेती संबंधी उत्पादनाची साधने ही जमीनदार वर्गाच्या कितपत ताब्यात होती. तसेच शेतीच्या मालकाच्या हक्कासंबंधी काय स्थिती होती. याशिवाय जास्तीत जास्त महसूल गोळा करण्याच्या मोगल शासकाच्या धोरणामुळे देशातील दारिद्र्यात कशी वाढ झाली आणि त्या वाढीचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांचे उठाव कसे झाले हे त्यांनी वरिल ग्रंथात विस्ताराने मांडले आहे. इ.स. १५५६ ते १६०७ या काळातील शेतीविषयक स्थितीचा आढावा त्यांनी या ग्रंथात मांडलेला आहे. इरफान हाबीब यांचा वरील ग्रंथ हा इ.स. १९६३ मध्ये पूर्ण झाला होता. त्यांनी या ग्रंथात मोगल कालखंडातील शेती उत्पादनाचा तसेच शेतमजूरांच्या स्थितीचा शेती उत्पादनाच्या साधनावरील मालकी हक्काचा, शेतसारा तत्कालीन शासनाचे शैक्षणिक धोरण, इत्यादी घटकांचा उहापोह वरील ग्रंथात इरफान हबीब यांनी केला होता. त्यांच्या लिखानामुळेच मोगलकालीन शेतीव्यवस्थेची माहिती जगासमोर आली होती. त्यामुळे त्यांच्या वरील ग्रंथास मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहात महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते, हे स्पष्ट होते.

**कार्ल मार्क्स व मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह :-**

इरफान हबीब आणि डॉ. आर.एस. शर्मा या दोन इतिहासकारांनी व विचारवंतानी मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह प्रबळ करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. तसेच योगदान कार्ल मार्क्स यांचे पण होते. कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाची सोप्या इंग्रजीत मांडणी करण्याचे महत्वाचे कार्य कार्ल मार्क्स यांनी केले होते. The Combridge Economic History of India या नावाचा ग्रंथ इरफान हबीब, तपन राय चौधरी यांनी संपादित करून तो ०३ खंडात प्रकाशीत केला होता. परंतू त्या प्रकाशनात मात्र पूर्णपणे मार्क्सवादी दृष्टीकोन होता. त्यांनी वेगवेगळ्या समविचारी तज्ञमंडळाकडून मध्ययुगीन भारताविषयीच्या स्थितीवर आधारित लेखाचे संकलन करून त्यांचे संपादन केले व तोच डाटा ग्रंथ रुपात प्रकाशित करण्याचे महत्वाचे कार्य केले. वरिल ग्रंथाच्या संपादन मंडळात सतीशचंद्र नुरूल हसन,

रामशरण शर्मा, डॉ. ए.आर. कुलकर्णी, सय्यद हसन वगैरे मंडळीचा समावेश होता. त्यांनी इ.स. १२०० ते १७०७ पर्यंतच्या कालखंडाचा आर्थिक इतिहास या ग्रंथात रेखाटलेला आहे. इरफान हबीब यांनी वरिल ग्रंथाशिवाय स्फुट शोधनिबंध अनेक नियतकालीकामधून प्रकाशित केले आहेत. त्यांच्या लिखानाचा आणि चिंतनाचा केंद्रबिंदू हा आर्थिक विषय होता. त्यामुळे त्यांच्या काही लेखांचे शीर्षक त्या लेखात कोणता विषय असेल हे दर्शवितात. वरिल सर्व लेखकांच्या लिखानावर मार्क्स वादाची छाप असल्याचे स्पष्ट होते.

**मोहम्मद हबीब :-**

मोहम्मद हबीब आणि इरफान हबीब हे दोघे मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाचे प्रणेते आहेत असे म्हटले जाते. त्यांचे नावामध्ये साम्य नाही. परंतू विचारसरणी मात्र मार्क्सवादाच्या प्रभावाची आहे. मोहम्मद हबीब यांचा जन्म उत्तरप्रदेशातील एका प्रतिष्ठीत कुटूंबात झाला होता. कालांतराने म्हणजे १९१६-२० या कालखंडात ऑक्सफर्ड विद्यापीठातून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांना Father of Modern Muslim Historiography या नावाने ओळखत जाते. त्याच्यावर पाश्चिमात्य विचार धारेचा फार मोठा प्रभाव होता. भारतावरील महंमद गझनीच्या आक्रमणाविषयी ते म्हणतात ते आक्रमण हे इस्लाम धर्माच्या प्रसारासाठी नव्हते तर या देशात असलेले सोने आणि संपत्ती यांची लुट करण्यासाठी होते. व त्यामधूनच हत्ती मिळवणे हा एक उद्देश होता, असे मोहम्मद हबीब यांनी आपल्या लिखानात अगदी स्पष्ट पणे मांडले आहे. त्याच्या या लिखानाचा भाग मात्र कट्टर धर्मीय मुस्लीमांना मान्य झाला नाही. तरी पण त्यांच्या विचारातूनच राष्ट्रवादी विचारांचे दर्शन घडते. भारतीय स्वातंत्र्यासाठी देशामध्ये सुरु असलेल्या स्वातंत्र्याच्या चळवळीत भारतीय मुस्लीमांनी सहभागी व्हावे असे त्यांनी आव्हान केले होते. ते हिंदू मुस्लीम ऐक्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांच्यावरील विचारश्रेणीमुळे अनेक मुस्लीम इतिहासकारांनी ते खरे मुस्लीम नाहीत अशी टिका केली होती.

**कॉ. शरद पाटील :-**

मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाचे प्रणेते वरील प्रमाणे पहिल्यानंतर कॉ. शरद पाटील यांचा पण मार्क्सवादी इतिहास लेखन विषयक दृष्टीकोन पहाणे क्रमप्राप्त ठरते. कॉ. शरद पाटील हे थोर विचारवंत असून बौध्द व जैन तसेच पाश्मिात्य तत्वज्ञानाचे ते प्रख्यात अभ्यासक आहेत. त्यांनी 'दासशुद्रांची गुलामगिरी' या दोन खंडातील ग्रंथावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव आहे. त्यामुळे कॉ. शरद पाटील यांचा मार्क्सवाद फुले- आंबेडकर वाद हा ग्रंथ याच चौकटीत बसतो आहे.

**सुमित सरकार :-**

सुमीत सरकार यांनी Swadeshi Movement in Bengal नावाचा जो ग्रंथ लिहीला त्या ग्रंथावर सुध्दा मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाचा प्रभाव आहे. त्यांनी १९८२ मध्ये Modern India या ग्रंथात शेतकरी, कामगार, कष्टकरी स्त्रीया व जातीविरोधी ज्या अनेक चळवळी घडून आल्या त्या चळवळीची नोंद सुमित सरकार सारख्या अभ्यासकांनी ब्रिटिशांच्या कर पध्दतीचा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या स्थितीवर कसा परिणाम झाला हे दाखवून दिले. या

प्रकारचा अभ्यास हा निल चार्लस्वर्थ यांनी पण केला होता. याशिवाय बार्डोली येथील शेतकऱ्यांच्या सत्यागृहाचा पण त्यांनी मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहाच्या माध्यमातून अभ्यास केला घेता.

वरील प्रमाणे वेगवेगळी उदाहरणे आणि संदर्भ यांच्या माध्यमातून भारतीय इतिहासातले मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाह या शोध निबंधात विशद केलेला आहे.

**संदर्भ सूची :-**

१. सदाशिव आठवले - इतिहास लेखनशास्त्र.
२. ई.एच.कार. - इतिहास म्हणजे काय?
३. द.वि. केतकर - इतिहासातील अंतःप्रवाह
४. वि.द. घाटे - इतिहासशास्त्र आणि कला
५. डॉ. गोविंदचंद्र पांडे - इतिहास स्वरूप एवं सिध्दांत
६. गद्रे प्रभाकर - इतिहासाची साधने एकशोध यात्रा
७. प्रभाकर देव - इतिहास : एक शास्त्र कल्पना प्रकाशन, नांदेड